# E-MASTERY ACADEMY
# Plot No.45, H-Sector N-4 Cidco
# Aurangabad

# नाम

- **पार्श्वभूमी**

**भाषा :-** विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय.

**शब्द** :- ठराविक क्रमाने आलेल्या अक्षरांच्या समूहाला अर्थ प्राप्त होत असेल अशा अक्षरांच्या समूहाला शब्द असे म्हणतात.

**वर्ण** :- तोंडाद्वारे बाहेर पडणाऱ्या मूलध्वनिंना वर्ण असे म्हणतात.

**वाक्य** :- वाक्य म्हणजे पूर्ण अर्थाचे बोलणे होय.

**अक्षर** :- आपल्या ध्वनीच्या खुणा म्हणजे अक्षर होय.

- मराठी भाषेत शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत.

नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभायान्वयी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय इ.

विकारी शब्दांच्या जातीत नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद यांचा समावेश होतो.

अविकारी शब्दांच्या जातीत क्रियाविशेषण अव्यय, उभयान्वी अव्यय, शब्दयोगी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय यांचा समावेश होतो.

**नाम :-** प्रत्यक्षात असणाऱ्या किंवा कल्पनेने जाणवलेल्या वस्तूंना, प्राण्यांना व गुणधर्माला जी नावे दिली जातात त्यांना नाम म्हणतात

**उदाहरणार्थ :-** पेरू, बदक, गोपाल, हवा, परी, इ.

ही अविकारी शब्दाची जात आहे.

**नामाचे तीन प्रकार पडतात.**

- **सामान्य नाम** :- ज्या नामाने समूहाचा उल्लेख होतो त्याच सामान्य नाम म्हणतात

**उदाहरणार्थ :-** विद्यार्थी, विमान, डोंगर, घर

**विशेष नाम :-** ज्यांना माने जातीचा बोध होत नसून, त्या जातीतील विशिष्ट व्यक्ति, वस्तू, प्राणी यांचा बोध होतो, त्यास विशेषनाम म्हणतात.

**उदाहरणार्थ :-** पुणे, गोदावरी, गोपाल इ.

| **सामान्य नाम** | **विशेष नाम** |
|---|---|
| देश | चीन, पाकिस्तान, भारत, श्रीलंका, जपान, |
| नदी | गंगा, सिंधू, नर्मदा, गोदावरी, कावेरी, तापी, |
| मुलगा | लखन, गोविंदा, किशोर, मकरंद |
| डोंगर | अजिंठा, बालाघाट, |
| धरण | जायकवाडी, राधानगरी, विष्णुपुरी, |

- **भाववाचक नाम :-** ज्याना माने एखाद्या पदार्थातील गुणधर्म किंवा भाव किंवा स्थिती यांचा बोध होतो त्यास भाववाचक नाम असे म्हणतात.

**उदाहरणार्थ** :- नम्रपणा, मित्रत्व, सौंदर्य, शहाणपणा, गुंडगिरी, चांगुलपणा, गुलामगिरी

| **शब्द** | **प्रत्यय** | **भाववाचक नाम** | **उदाहरणे** |
|---|---|---|---|
| नवल | आई | नवलाई | दांडगाई, खोदाई, चपळाई, धुलाई, |
| गुलाम | गिरी | गुलामगिरी | दादागिरी, गांधीगिरी, गुंडगिरी, लुच्चेगिरी |
| श्रीमंत | ई | श्रीमंती | गरीबी, हुशारी, नादारी लबाडी |
| मनुष्य | त्व | मनुष्यत्व | पितृत्व, मातृत्व, शत्रुत्व, मित्रत्व, प्रौढत्व |
| सुंदर | य | सौंदर्य | माधुर्य, शौर्य, धैर्य, गांभीर्य |
| शहाणा | पण, पणा | शहाणपण-पणा | मोठेपणा, नम्रपणा, खोटेपणा, प्रामाणिकपणा |
| पाटील | की | पाटीलकी | शाबासकी,आपुलकी, फुशारकी |
| गोड | वा | गोडवा | गारवा, ओलावा |
| शांत | ता | शांतता | नम्रता, समता, क्रूरता |
| साहित्य | इक | साहित्यिक | सांस्कृतिक, सामाजिक |

काही शब्दांना प्रत्यय लागून भाववाचक नामे तयार होतात ती पुठीलप्रमाने

**नामाचे कार्य व नामाच उपयोग**

१. सामान्यनामाचे अनेकवचन होऊ शकते; परंतु विशेषनाम व भाववाचक नाम यांचे अनेकवचन होत नाही

**उदाहरणार्थ :-**

1. सामान्यनामाचे अनेकवचन होते.

गाडी-गाड्या, रस्ता-रस्ते, नदी- नद्या,

2. विशेष नामाचे अनेक वचन होत नाही.

प्रकास-प्रकास, गोदावरी-गोदावरी, हिमालय-हिमालय

3. भाववाचक नामाचे अनेक वचन होत नाही.

गारवा-गारवा, मोठेपणा- मोठेपणा, नम्रपणा-नम्रपणा

२. विशेष नाम हे सामान्य नामाचे कार्य करतात.

**उदाहरणार्थ :-** तो काय हरिश्चंद्र आहे?

३. सामान्यनामा हे केव्हा केव्हा विशेषनामाचे कार्य करतात.

**उदाहरणार्थ :-** आम्ही काळ नगरहून आलो.

४. भाव्वाचाकनामे हे विशेषनामाचे कार्य करतात.

**उदाहरणार्थ :-** पाटीलकी हि माझ्या रक्तात आहे.